# सं पा द की य

## शाहीनबागच्या दिग्दर्शक महिला

'Frailty thy name is woman' असं हॅम्लेटनं उद्वेगानं म्हटलेलं वाक्य खोटं सिद्ध करत दिल्लीच्या शाहीनबाग परिसरातील महिलांनी सुधारित नागरिकत्व कायद्याला विरोध करण्यासाठी १५ डिसेंबरपासून रस्त्यावर ठाण मांडलं आहे. शाहीनबाग नावच्या बागेला त्या नवा अर्थ देत आहेत.

हे आंदोलन अनेक अर्थांनी वेगळं आहे- निषेधाचं स्थळ, प्रस्थापित पुरुषी नेतृत्वाचा अभाव, आंदोलनकर्त्यांची सामाजिक पार्श्वभूमी, निर्धार, सलगता, आंदोलनाची पद्धती, सृजनशील अभिव्यक्ती, आणि शाहीन बागेनं जन्म दिलेली लखनौ, मुंबई, अलाहाबाद, अशा आणखी इतर अनेक ठिकाणची आंदोलनं, इ. हे आंदोलन लोकशाहीमध्ये नागरिकांच्या सतर्क सहभागाविषयी अपेक्षा वाढवणारं आणि त्यामुळं लोकशाही बळकट होण्याच्या आशा पल्लवित करणारं आहे.

शाहीनबाग आंदोलनाविषयी माध्यमांतून जे संवेदनशील, अर्धवट, भलंबुरं असं वार्तांकन आजपर्यंत हाती लागलं आहे त्यातून भारतीय महिलांच्या क्षमतांविषयी पुरुष-जनमानस फारसं जाणत नाही, हेच चित्रं उभं राहतं. कारण मुस्लिम महिला असं स्वतंत्र काम कशा करू शकतील? अशी आश्चर्य व्यक्त करणारी शंकाच प्रामुख्यानं त्यातून डोकावताना दिसली, आणि त्यातून आंदोलनांचे नेमके राजकीय अर्थ काय, बोलविता धनी कोण, नेमक्या स्त्रिया कोण, याची चर्चा सुरू झाली. काय प्रतिक्रिया द्यावी याबद्दल सत्ताधारी पुरुष-मानसाची नमुनेदार गोची झालेली दिसली.

महिलांवर शस्त्र चालवू नये ही सांस्कृतिक शिकवण, जी पुरुषी औदर्याची खूण समजली जाते, ती पाळणं एकीकडे एक-सांस्कृतिक राष्ट्र तयार करायला निघालेल्या राष्ट्रनेत्यांना गरजेचं होतं तर दुसरीकडे प्रतिमा-संवर्धनासाठी पुरुषी-राष्ट्रवादी प्रतिकार आवश्यक होता. त्यातून दिल्लीच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपच्या अनेक लहानमोठ्या नेत्यांकडून हिंसक भाषा वापरली गेली. त्यातूनच गोळीबाराची एक घटना घडली.

या आंदोलनाचं राजकीय भविष्य काय हे आज सांगता येणार नाही पण सहभागी स्त्रियांची प्रेरणा, हिम्मत, सद्सद्विवेक, राजकीय जागरुकता आणि वर्तमान स्थिती काय आहे याविषयी काही अंदाज बांधता येतील. सर्वसामान्य भारतीय स्त्रियांकडे असणाऱ्या क्षमता जसं हे आंदोलन अधोरेखित करतं, तशाच त्यांच्या मर्यादाही दाखवतं. स्त्रियांच्या मोर्चांचं पारंपारिक दृश्य रूप लाटणं, हंडे अशा स्त्रीत्वाशी निगडित मानल्या जाणाऱ्या प्रतिकांनी सजणं आणि त्यात केल्या जाणाऱ्या मागण्या स्त्रियांच्या प्रश्नांशी संबंधित असलेल्या बघणं आपल्या सवयीचं आहे. इथं रस्ता ही सार्वजनिक पुरुषी-जागा ठिय्या मारून बसण्यासाठी अधिग्रहित करणं, कविता लिहिणं, भाषणं देणं, घोषणा देणं, पोस्टर्स रंगवणं, अशा मार्गांनी त्यांनी लिंगभावविरहित रूप आंदोलनाला दिलंय पण त्याचबरोबर लहान मुलांना बरोबर ठेवणं, दुपारनंतर गर्दी करणं, भावनाप्रधानतेनं तळमळून बोलणं अशा मार्गांनी त्याचं स्त्री रूपसुद्धा अधोरेखित केलं आहे. त्यामुळं दुसऱ्या महायुद्धानंतर पश्चिमेकडच्या स्त्रियांना जसं घरात आणि पारंपरिक भूमिकेत परतावं लागलं आणि ते त्यांना खुपलं, तसं

या स्त्रियांचं होणार का, हा प्रश्न मनात येतो. ही राजकीय जागरूकता त्यांना वैयक्तिक प्रश्नांबाबत दाखवता येते का, अशी शंका निर्माण होते. स्त्रीत्वाचा अवकाश खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्रांमध्ये विभाजित करण्याची आणि तो पुरुषी अवकाशाच्या संदर्भात पाहण्याची स्त्रीवादी अभ्यासाला सवय आहे, तशी पद्धत पडून गेलेली आहे. पण आता या आंदोलनानं या कक्षा रुंदावल्या आहेत, कारण स्त्रीत्वाचा अवकाश मधे न आणता या स्त्रियांनी संसदेत पास केलेल्या कायद्याच्या संभाव्य जुलुमी स्वरुपाबद्दल प्रश्न विचारले आहेत, विरोध दर्शवला आहे. त्यांचं आंदोलनात सहभागी होण्याचं कारण कोणत्याही ठरावीक स्त्रीप्रश्नासंदर्भात नाही. त्यातून त्यांनी खाजगी अवकाशाचे, पुरुषप्रधान संस्कृतीच्या विरोधातले एरवीचे लढे मागे सोडून दिले आहेत. त्या पुरुषसत्तेच्या विरोधाचं महत्त्व कमी करून टाकलं आहे. त्यांची ही कृती मधले लिंगभावाचे धार्मिक, राजकीय आणि आर्थिक ध्रुवीकरणाचे अंतर कापत राजकीय विरोधाच्या पुरुषी अवकाशाला एकदम व्यापून टाकणारी आहे, भारतीय स्त्रीवादी विचाराला पुढे नेणारी, आणि म्हणून अभिनंदनीय आहे. आता भारतीय स्त्रीचा विचार एक नागरिक म्हणून, भारतीय पुरुष नागरिकांसारखाच, प्राधान्यानं करावा लागेल. नागरिक म्हणून तिच्या हक्कांची भाषा करावी लागेल, निव्वळ स्त्री म्हणून नव्हे. म्हणजेच या आंदोलनाने स्त्री संघर्षाचा गियर बदलत शासन व्यवस्थेला आणि संसदीय सार्वभौमत्वाच्या नावाखाली निर्मित अन्यायाला थेटपणे भिडण्याचं काम केलेलं आहे. आणि हे यश परीघावरच्या, दबलेल्या, सार्वजनिक संधींपासून वंचित राहिलेल्या मुस्लिम महिलांकडून मिळवलं गेलं आहे, हे अधिक चांगलं.

●


परिवर्तनाचा वाटसरू

## परिवर्तनाचा वाटसरूसाठी लेखन पाठवताना

आपले लेखन पाठवताना संपादनाच्या सोयीसाठी
ते सुवाच्य अक्षरात लिहिलेले
वा टंकलिखित वा संगणकाद्वारा मुद्रित केलेले असावेत.
मुद्रित लेख एमएस वर्ड अथवा पेजमेकरमध्ये
श्रीदेव ७-०७०८ या अथवा युनिकोड फाँटमध्ये पाठवावे.